महापालिका आयुक्त कार्यालय,
पुणे महानगरपालिका
जा. क्र :- मआ/एलओ/ २१५५
दिनांक -२३/८/२०२१

## – कार्यालय परिपत्रक –

विषय :- संघटनेची वार्षिक सभासद वर्गणी रु.३००/–सभासद सेवकांच्या वेतनातून कपात करणेबाबत.

संदर्भ :- १. कार्यालय परिपत्रक जा.क्र.सआ/सका/१७४, दि.१२/५/१९९७.
२. कार्यालय परिपत्रक जा.क्र.सआ/सका/२१५, दि.११/५/१९९९.
३. मा.महापालिका आयुक्त ठराव क्र. ६/३४९ ,दि. १०/०८/२०२१

पुणे मनपा कामगार युनियन या मान्यताप्राप्त संघटनेच्या सभासदांची वार्षिक वर्गणी प्रतिवर्षी कपात करणेविषयी संदर्भ क्र.१ व २ अन्वये स्थायी आदेश प्रसृत केले आहेत.

सन २०२० करिता वर्ग ३ व ४ मधील सभासद सेवकांची वर्गणी कपात करण्याची मागणी पुणे मनपा कामगार युनियन (मान्यता प्राप्त) व पी.एम.सी.एम्प्लॉईज युनियन यांनी केली आहे. वर्ग ३ व ४ मधील सभासद सेवकांची सभासद वर्गणी माहे **ऑगस्ट २०२१** पेड इन **सप्टेंबर** २०२१ च्या वेतनातून रु.३००/– कपात करणेस मा.महापालिका आयुक्त यांची संदर्भ क्र.३ चे ठरावान्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

तरी, संदर्भ क्र.१ व २ चे परिपत्रकातील विहीत अटी व शर्तीस अधिन राहून वर्ग ३ व ४ मधील पुणे मनपा कामगार युनियन (मान्यता प्राप्त) या संघटनेच्या सभासद सेवकांची वार्षिक सभासद वर्गणी रु.३००/– प्रमाणे माहे **ऑगस्ट २०२१** पेड इन **सप्टेंबर** २०२१ चे वेतनातून खालील बाबी विचारात घेवून कपात करण्यात यावी.

१. पुणे मनपा कामगार युनियन (मान्यता प्राप्त) व पी.एम.सी. एम्प्लॉईज युनियन यांच्या ज्या सभासद सेवकांनी सभासद वार्षिक वर्गणी कपात करण्यास यापूर्वी संमती दिलेली आहे अशा सेवकांकडून पुन्हा संमती पत्र घेण्याची आवश्यकता नाही. **तथापि सदर संमती पत्र संबंधित कार्यालयाकडे जमा असणे आवश्यक आहे.** संबंधित सेवकांची संमतीपत्रे त्यांच्या **सेवापुस्तकामध्ये नमूद करण्यात यावीत**.

२. उपरोक्त नमूद संघटनांच्या ज्या सभासद सेवकांनी यापूर्वी सभासद वर्गणी कपात करण्यास संमती दिली आहे तथापि चालू वर्षी **कपात करण्यात येवू नये असे लेखी कळविल्यास** त्यांची सभासद वर्गणी कपात करण्यात येवू नये.

३. पुणे महानगरपालिकेमध्ये जे सेवक नव्याने नियुक्त होवून रुजू झाले आहेत त्यांनी नव्याने सभासद वर्गणी कपात करणेबाबत लेखी संमती देणे आवश्यक आहे. **जे सभासद, सभासद वर्गणी कपात करण्याबाबत लेखी संमती देणार नाहीत त्यांची सभासद वर्गणी वेतनातून कपात करु नये.**

४. पुणे महानगरपालिका कामगार युनियन (मान्यताप्राप्त) व पी.एम.सी. एम्प्लॉईज युनियन यांच्याव्यतिरिक्त ज्या कामगार संघटनांनी संमतीपत्रे सादर करुन वर्गणी कपात करण्यास विरोध दर्शविला आहे, त्या कर्मचारी सभासदांची वर्गणी कपात करण्यात येऊ नये. याबाबत आहरण व संवितरण अधिकारी यांनी अत्याधिक दक्षता घ्यावयाची आहे.

५. वेतनपत्रक लेखनिकांकडून उपरोक्त बाबींची दखल न घेता सेवकांची वर्गणी कपात केल्यास व त्यामुळे काही तक्रारी निर्माण झाल्यास त्यांचे विरूद्ध प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

**उपरोक्त बाबींची वेतनपत्रक लेखनिक आणि आहरण व संवितरण अधिकारी यांची जबाबदारी आहे, याची नोंद घेवून दक्षतापूर्वक कार्यवाही करावी.**

सदर जमा होणारी रक्कम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नियंत्रणाखालील कोष कार्यालयामार्फत पुणे मनपा कामगार युनियन (मान्यताप्राप्त) यांना आदा करणेची दक्षता घ्यावी.

सर्व खातेप्रमुख/ महापालिका सहाय्यक आयुक्त/ विभाग प्रमुख आणि वेतनबिल लेखनिक यांनी परिपत्रकामध्ये नमूद केल्याप्रमाणे वर्गणी कपात करण्याची दक्षता घ्यावी.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका.

प्रत :

१) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज./वि./ई.)
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस माहितीसाठी..

२) सर्व खातेप्रमुख / महापालिका सहाय्यक आयुक्त / विभागप्रमुख,
पुणे महानगरपालिका.
यांजकडेस माहिती व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना...